अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

कार्यालय - नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२२६
ई-मेल ac2mpkv@gmail.com

पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता.राहुरी,
जि. अहमदनगर. पिन- ४१३ ७२२.

जा.क्र.मफुकृवि//नियंत्रक/लेखा-२/ १३ /२०२४ दिनांक: ०४ /०४/२०२४

**परिपत्रक**

**विषय: -** अ) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात प्रशासकीय मंजूरी मिळालेले प्रस्ताव सन २०२४-२५ मध्ये पुन:श्च सादर न करणेबाबत...
ब) स्थायी अग्रीमांसाठी पुन:श्च मंजूरी न घेणेबाबत...

१. उपरोक्त विषयान्वये सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ महसुली उत्पन्न/ कार्यक्रम (योजनांतर्गत) योजना/ फिरता निधी/ भा.कृ.अ.प.विद्यापीठ बळकटीकरण योजना (ICAR-SAU) दुरुस्ती व देखभाल योजनांसाठी प्राप्त ३१- वेतनेत्तर योजना, उत्पादके चाचणी निधी/ 10% Institution Charges सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये मा.कुलगुरू महोदयांनी प्रशासकीय मान्यता दिलेली असताना सन २०२४-२५ मध्ये त्या मंजूरीन्वये खर्चाची कार्यवाही पूर्ण न झाल्यामूळे संबंधित कार्यालये सदर प्रस्ताव पुन:श्च पुढील आर्थिक वर्षात सादर करतात, त्यामूळे मंजूरीची व कामकाजाची पुनरावृत्ती होते.

२. या अनूषंगाने मा.कुलगुरू महोदय यांचे मान्यतेने कळविण्यात येते की,

(अ) मा.कुलगुरू महोदय यांनी लेखासंहिता नियम ६.५ व अधिनियम १९८३ चे कलम १२ (ई) चे अनुषंगाने रु.३.०० लाखापर्यतच्या बांधकाम खर्चासाठी सन २०२३-२४ मध्ये वरील नमूद निधींमधील मान्यता प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांची प्रशासकीय मान्यता लेखासंहिता नियम ६.१२ नूसार पुढील वर्ष २०२४-२५ अखेरपर्यंत ग्राहय राहील.

(ब) मा.कुलगुरू महोदय यांनी अधिनियम १९८३ चे कलम १२ (फ) चे अनुषंगाने यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदीस्तव रु.५.०० लाख पर्यंतचे खरेदी खर्चास सन २०२३-२४ मध्ये दिलेल्या वरील नमूद निधींमधील मान्यता सन २०२४-२५ अखेरपर्यंत ग्राहय राहतील.

(क) यामध्ये GoI Funded, ICAR, RKVYव तत्सम राज्य शासन (Plan Schemes) अथवा केंद्र शासन अनुदानित त्याच बांधकामांचा/खरेदी प्रस्तावांचा समावेश असेल,ज्यासाठी सन २०२३-२४ मध्ये प्राप्त अनुदान आवश्यकतेनुसार सन २०२४-२५ मध्ये खर्च करण्यास्तव निधी वितरण करणाऱ्या

संस्थेचे (Funding Agency) चे सन २०२४-२५ साठी Revalidation प्राप्त झालेले आहे. अशा बांधकाम खरेदी प्रस्तावांना सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात दिलेली मान्यता सन २०२४-२५ अखेरपर्यंत ग्राहय राहील.

(ड) यापूर्वी मंजूर असलेले सर्व स्थायी अग्रीम यथास्थिती कार्यरत राहतील. त्यामुळे त्यांचे पूर्नमान्यतेस्तव नवीन आर्थिक वर्षात प्रस्तावित करण्याची आवश्यकता नाही. तसेच दिनांक ३१/०३/२०२४ अखेर त्यांच्या समर्पणाची कार्यवाही न करता लेखासंहिता नियम ३.६०(viii) नूसार केवळ शिल्लक कळवावी.

३. वरील सुचना विचारात घेऊन सन २०२३-२४ मधील प्रशासकीय मान्यतेच्या नस्त्या सन २०२४-२५ मध्ये पुर्नजिवीत (Revalidate) करण्यासाठी सादर करण्यात येवू नयेत.

(सदाशिव.पाटील)
नियंत्रक,
म.फु.कृ.वि., राहुरी

प्रति,
१.सर्व आहरण व संवितरण अधिकारी
२.सर्व अधिदान व लेखा अधिकारी

प्रत माहितीस्तव सादर
१. मा.संचालक,विस्तार शिक्षण/संशोधन/कृषि शिक्षण, मफुकृवि,राहुरी.
२. मा.सहयोगी अधिष्ठाता, मफुकृवि,राहुरी. (सर्व)
३. मा.कुलसचिव, मफुकृवि,राहुरी.
४. सर्व विभागप्रमुख, मफुकृवि,राहुरी.
५.सहयोगी संशोधन संचालक (सर्व)
६.मा.कुलगुरू महोदय यांचे स्वीय सहाय्यक